**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | Subject |
|---|---|---|---|---|
| Maharashtra Times | Nashik | 07/01/2017 | 02 | Mintage World (Nashik Exhibition) |
| | | | | |

# प्राथमिक शाळेपासून असावा नाण्यांचा अभ्यासक्रम

**मिंटेजवर्ल्ड डॉट कॉम यांच्या वतीने नाशिकमध्ये तीन दिवस 'रेअर फेअर २०१७' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात कॉइन, बँकनोट, स्टॅम्प्स व दुर्मिळ वस्तू पाहण्यासाठी आणि विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. चोपडा लॉन्स, जुना गंगापूर नाका, गंगापूररोड येथे भरविण्यात आलेले हे प्रदर्शन शिवाजी महाराजांना समर्पित करण्यात आले आहे. अशा चाकोरीबाहेरच्या प्रदर्शनांची चोखंदळ रसिकांना मेजवानी देणारे मिंटेजवर्ल्डचे सीईओ सुशीलकुमार अग्रवाल यांच्याशी त्यांच्या ऑनलाइन पोर्टलबद्दल केलेली बातचीत...**



**■ मिंटेजवर्ल्ड डॉट कॉम या संकल्पनेबद्दल सांगा?**

➤ मिंटेजवर्ल्ड डॉट कॉम ही साइट असून, हे जगातील पहिले ऑनलाइन संग्रहालय आहे. कॉइन्स, जुन्या-नव्या नोटा, स्टॅम्प्स, भारतातीलच काय, परंतु जगातील कॉइन्सची सूक्ष्म माहिती या साइटवर देण्यात आली आहे. या सर्व कॉइन्सचे फोटो, त्यांचा इतिहासदेखील साइटवर टाकण्यात आला आहे. या साइटचा अभ्यासकांना प्रचंड फायदा होतो. अनेक जण आम्हाला प्रतिक्रिया देताना आमच्या या साइटबद्दल भरभरून धन्यवाद देतात. एकूणच कॉइन, स्टॅम्प्स कशाकरिता बनले आहेत, त्यांचा धातू कोणत्या प्रकारचा आहे, त्यांचा पूर्ण इतिहास काय आहे, हे सर्व डिटेल जगाला कळण्यासाठी ही साइट तयार केली आहे.

**■ मिंटेजवर्ल्डचा डॉट कॉमचा उद्देश काय आहे?**

➤ मिंटेजवर्ल्डचे तीन-चार उद्देश आहेत. मूळ म्हणजे इतिहासाकडे पाहण्याची एक दृष्टी लाभावी, हा महत्त्वाचा उद्देश आहे. कॉइन्स, बँक नोटा, स्टॅम्प्स यांचा शैक्षणिक इतिहास लोकांना माहिती होण्यासह संशोधक, ऑर्किओलॉजी शिकणारे यांना अभ्यासक्रमात येणाऱ्या अनेक अडचणींवर आमची साइट उपयोगी पडते. सगळे डिटेल्स एकाच ठिकाणी मिळावेत, त्यासाठी अन्यत्र भटकावे लागू नये हादेखील उद्देश आहे. जगात अशी कोणताही साइट नाही की ज्यावर तुम्हाला आमच्याइतके डिटेल्स मिळतील. त्यानंतर जे कॉइन्स जमा करणारे आहेत, त्यांना या साइटचा उपयोग होतो. कलेक्टर, ट्रेडर्स या साइटवर पाहूनच कॉइन्सची किंमत ठरवू शकतात. या वर्षात कोणते कॉइन कुठे काय किमतीत विकले गेले हेदेखील साइटवर सांगत असल्याने किंमत ठरविण्यासाठी चांगला उपयोग होतो.

**■ मिंटेजवर्ल्ड यूथसाठी कसे काम करते?**

➤ कोणताही छंद हा आपल्या जीवनाला एक वेगळे वळण लावतो. छंदामुळे जगणे सुसह्य तर होतेच, परंतु दिशाही मिळते. आज तरुणवर्गाला अनेक ठिकाणी मोल्ड केले जात आहे. त्यांना या धावपळीच्या जगण्यातून क्षणभर विश्रांतीची गरज

**टॉक टाइम**

असते, ती विश्रांती त्यांना छंदातून मिळू शकते. मिंटेजवर्ल्ड जगायला शिकवते. येथे असलेले कॉईन्स, नोटा या मनाला विश्रांती देणाऱ्या असतात. उलाढाल हा नंतरचा भाग आहे. परंतु, ही साइट आधी कॉइनकडे पाहायला शिकवते. यूथची एनर्जी वेस्ट जाऊ न देता त्याचा वापर हितावह कामासाठी करण्याला मिंटेजवर्ल्ड सहाय्य करते.

**■ म्युझियमची खासियत काय आहे?**

➤ हे म्युझियम तरुणपिढीला जुन्या व सध्या दुर्मिळ होत चाललेल्या छंदाकडे आकर्षित करण्याचा एक प्रयत्न करीत आहे. हे म्युझियम भारतातील, तसेच जगातील सर्वांत मोठे ऑनलाइन म्युझियम असून, याद्वारे विद्यार्थी, संग्राहक, तज्ज्ञ, विक्रेते, गुंतवणूकदार व इतर जनतेमध्ये ज्ञान प्रसारण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. जगातील सर्वांत दुर्मिळ व मौल्यवान कॉइन, बँकनोट व स्टॅम्प्स यांची इत्थंभूत माहिती व मनोरंजक इतिहास म्युझियममध्ये उपलब्ध असून, याद्वारे अशा संग्रहाचे मोल, काळ, संस्कृती व ऐतिहासिक महत्त्व यांचे ज्ञान मिळते. देशातील व देशाबाहेरील प्रदर्शने, मेळावे, लिलाव याबद्दलही माहिती येथे उपलब्ध आहे.

**■ नाणे या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश असावा का?**

➤ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अडीच वर्षांपूर्वी या पोर्टलचे उद्घाटन केले, तेव्हा सांगितले होते, की कल्चरल हेरिटेज जपायला हवे. हे कुणी जपणार असतील तर ते म्हणजे आजकालची शाळेतील पिढी. त्यांना कॉइन समजणे ही खरी काळाची गरज आहे. नाण्यांचा इतिहास शिकण्यासाठी ग्रॅज्युएशन, पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सेस आहेत. परंतु, खरी गरज आहे ती प्राथमिक इयत्तेपासून लळा लावण्याची. विद्यार्थ्यांना पैशांचे आकर्षण असते, हेच आकर्षण हेरले आणि त्यांना चार आणे, पन्नास पैसे, एक रुपयाचा कॉइन, पाच रुपयांचा कॉइन याविषयी आतापासूनच कळले, तर त्यांचे प्रकार, त्यामागे असणारी चित्रे यांचा अभ्यास ते करतील आणि त्यांच्यातील कुतूहल जागे होईल. त्यामुळे प्राथमिक स्तरापासूनच नाण्यांबाबत शिकवले जावे, असे मला वाटते.

**शब्दांकन : प्रशांत भरवीरकर**